जळगाव दि. ६ ( प्रतिनिधी) आजच्या काळात समाजाची चेतना व समज वाढविणाऱ्या संशोधनाची गरज असल्याचे प्रतिपादन डॉ. व्ही.एस. कंची यांनी व्यक्त केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेतील शिक्षणशास्त्र विभागाच्या वतीने सिस्टमॅटीक मेथड फॉर अकॅडमीक रिसर्च ॲण्ड टेक्नॉलॉजी याविषयावर सुरु झालेल्या दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादात बीजभाषक म्हणून ते बोलत होते. व्य.प. सदस्य डॉ. पवित्रा पाटील अध्यक्षस्थानी होत्या. नवोपक्रम, नवसंशोधन साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. राजेश जवळेकर प्रमुख पाहुणे म्हणून हजर होते. डॉ. कंची म्हणाले की, आज कृत्रिम बुध्दीमत्तेच्या युगात क्षणभरात संशोधन प्रस्ताव व संशोधन लेख तयार करून मिळतात परंतु त्यांचा दर्जा ही चिंतेची बाब आहे. एआयच्या मदतीने माहितीचे संकलन चांगल्या प्रकारेमिळते मात्र त्याला मानवी संवेदना देउन योग्य पध्दतीने मांडल्यास उपयुक्त संशोधन होवू शकते. डॉ. जवळेकर यांनी नावीन्यता व विचारशैली यांचे महत्व अधोरेखीत केले. डॉ. पवित्रा पाटील यांनी सद्या लोकप्रिय प्रकार सर्व्हेक्षण व मुलाखत तंत्राचा वापर या मुद्यावर प्रकाश ठाकून एआय मुळे संशोधक व विद्यार्थी कसे आळशी होत आहेत. मात्र एआयमुळे नोकरीच्या अनेक संधी येवू शकतात याकडे लक्ष वेधले. यावेळी प्रशाळेच्या संचालक डॉ. मनिषा इंदाणी, समन्वयक डॉ. संतोष खीराडे, इंजी. राजेश पाटील हजर होते. डॉ.लिना चौधरी यांनी सूत्रसंचालन केले. राजेश पाटील यांनी आभार मानले. दुपारच्या सत्रात प्रा. संदीप भामरे यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर सहभागींनी गटचर्चा केली.

**बातमी क्र. २**

जळगाव दि. ६ ( प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नंदुरबार येथील आदिवासी अकादमीत गुरूवार दि. ६ मार्च रोजी विद्यार्थ्यांसाठी यशस्वी करिअर आणि जीवनकौशल्य या विषयावर झालेल्या कार्यशाळेत १५० विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

प्रधानमंत्री राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाअंतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. . या कार्यक्रमाचे उद्घाटन नंदुरबारचे जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त प्रदीप रिसे यांनी केले. मुख्य अतिथी म्हणून व्य.प.सदस्य प्राचार्य डॉ. महेंद्र रघुवंशी हजर होते. अकादमीचे प्रभारी संचालक डॉ.किशोर पवार अध्यक्षस्थानी होते. प्रदीप रिसे यांनी सांगितले की, सकारात्मक दृष्टीकोन ठेवून विद्यार्थ्यांनी सर्व प्रकारची कौशल्य आत्मसात करावी. प्राचार्य रघुवंशी यांनी कौशल्य असेल तर आयुष्यात यश व प्रसिध्दी मिळेल असे सांगत काही उदाहरणे दिली. अध्यक्षीय भाषणात डॉ.किशोर पवार यांनी विद्यार्थ्यांच्या विकासासाठीविद्यापीठ नेहमीच प्रयत्नशील आहे. मात्र विद्यार्थ्यांनी स्वत:हून प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे सांगितले यावेळी विद्यापीठातील अमेरिकन इंडिया फाऊंडेशन रेमो सेंटरचे सल्लागार अमित मेश्राम, रोशनी जैन तसेच तळोदा येथील प्रा. निलेश गायकवाड, प्रा. नितीन तायडे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अकादमीचे प्रशासकीय समन्वयक डॉ. आर.पी. पाटील, प्रा. स्मीता देशमुख, प्रा. हर्षल चौरे, डॉ. अर्चना पाटील, प्रतिभा गांगुर्डे आदींनी परीश्रम घेतले.

**बातमी क्र. ३**

जळगाव दि. ६ ( प्रतिनिधी) डिसेंबर २०२४ महिन्यात नेट परीक्षा उत्तीर्ण झालेल्या ज्याविद्यर्थ्यांना पीएच.डी. प्रवेशासाठी युजीसीने पात्र ठरविले आहे त्यांनी निकाल जाहीर झाल्यापासून ३०दिवसांच्या आत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अर्ज भरून आवश्यक कागदपत्रे संशोधन विभागाकडे सादर करावीत असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

डिसेंबर २०२४ महिन्यात नेट परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व पीएच.डी. प्रवेशासाठी युजीसीने पात्र ठरविलेल्या विद्यार्थ्यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संकेतस्थळावर पीएच.डी. पेज वरील पेट-२०२४ यालिंक वर क्लीककरून अर्ज भरून आवश्यक ती कागदपत्रे अपलोड करावीत ऑनलाईन अर्जा करीता निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांपर्यंत विद्यापीठाच्या संशोधन विभागाकडे निकालाच्या प्रतीसह अर्जाची प्रत डाऊनलोड करून हार्डकॉपीसह आवश्यक त्या कागदपत्रांसह विद्यापीठाच्या संशोधन विभागात सादर करावीत असे आवाहन संशोधन विभागाचे सहायक कुलसचिव प्रवीण चंदनकर यांनी केले आहे.

**बातमी क्र. ४**

जळगाव दि. ६ ( प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत चालविण्यात येणाऱ्या डे-केअर सेंटरमध्ये स्नेह संमेलन व पारितोषीक वितरण समारंभ पार पडला.

भौतिकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. जयदीप साळी अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.व्ही.एम. रोकडे, केंद्रीय विद्यालयाचे प्राचार्य सोना कुमार हजर होते.प्रिती सोज्वल यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. पूजा थोरात यांनी आभार मानले.

…………………………………………………………………………………………………………………………

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ६ मार्च, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी